NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(संलग्नता विभाग)

# परिपत्रक

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ०४/०७/२०१७ रोजीचा शासन निर्णय क्रमांक: एनजीसी - २०१७/(१२८/१७)/मशि-४ अन्वये उच्च माध्यमिक शालात परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचे वाढते प्रमाण व विद्यार्थ्यांच्य विशिष्ट अभ्यासक्रमाकडे असलेला कल विचारात घेवून कोणताही विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (८) मधील तरतूदीनुसार असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकडयांना जलदगती पध्दतीने मंजूरी देण्याबाबतची कार्यपध्दती व निकष विहित केलेले आहेत.

त्याअनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दिनांक ०४/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने जलदगती तुकडी मागणी संदर्भात प्रस्ताव सादर करावयाचे आहेत, अशा महाविद्यालयांनी ०३ प्रतित प्रस्ताव दिनांक २८/०७/२०२६ पर्यंत विद्यापीठास सादर करावेत.

- दिनांक ०४/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील **परिशिष्ट-अ** अन्वये प्रस्तावाचा अर्ज सादर करावा.
- **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केलली कागदपत्रे पृष्ठ क्रमाकासह अर्जासोबत जोडण्यात यावीत.
- **परिशिष्ट-क** मधील तपशिल विद्यापीठाने शासनाने सादर करावायाचा असला तरी, सदरचा तपशील महाविद्यालय व संबंधित महाविद्यालय असलेल्या तालुक्याशी निगडीत असल्यामुळे परिशिष्ट-क मध्ये नमूद केलेल्या रकाना क्र. १ ते १३ पैकी अ.क्र. ३ व १३ वगळता उर्वरित माहिती महाविद्यालयांनी तपशीलवारव सुस्पष्ट भरून त्यावर महाविद्यालयाच्या मा. प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक आहे.
- जलदगती तुकडीचा प्रस्ताव सादर करताना जी महाविद्यालये नॅक मुल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरिता पात्र आहेत. अशा महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे.
- ज्या अभ्यासक्रमांना शिखर परिषदेची (Apex Body) मान्यता आवश्यक आहे. अशा महाविद्यालयांनी जलदगती तुकडीचे प्रस्ताव सादर करून नयेत.

या परिपत्रकाच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांवर विहित कार्यवाही करून पात्र ठरलेले प्रस्ताव विद्यापीठाच्या शिफारशीसह शासनास सादर करण्यात येतील व शासन मान्यतेनंतर सदर बाब संबंधित महाविद्यालयांस अवगत करण्यात येईल.

(डॉ. उ. वि. मेटकरी)
उपकुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/जलदगती तुकडी/२०२६-२७/6702
दिनांक : 17 JUL 2026

**सोबत** :- दिनांक ०४/०७/२०१७ रोजीचा शासन निर्णय.

प्रति,
**मा. प्राचार्य/प्रभारी प्राचार्य/संचालक/अध्यक्ष/सचिव,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.